# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ०५ /२०२१**

**विषय : ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२० सत्रातील (नियोजित एप्रिल/मे २०२१) प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित व अनुशेषित (Regular/Backlog/Repeaters) परीक्षांचे आयोजन ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना.**

कोविड १९ प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित व अनुशेषित विषयांच्या ऑनलाईन पध्दतीने परीक्षांचे नियोजन दि. १० एप्रिल २०२१ पासून करण्यात आले आहे. याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सुचना खालीलप्रमाणे.

१. प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित, अनुशेषित व रिपीटर (Regular/Backlog/Repeaters Subjects) परीक्षांचे नियोजन ऑनलाईन पध्दतीने दिनांक १० एप्रिल, २०२१ पासुन करण्यात आले आहे. या परीक्षा फक्त ऑनलाईन प्रॉक्टर्ड बहुपर्यायी प्रश्नाद्वारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने घेण्यात येतील. ऑनलाईन प्रॉक्टर्ड पध्दतीने होणाऱ्या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या ६० मिनिटे (एक तास) कालावधीच्या राहतील. यासाठी ६० बहुपर्यायी प्रश्न (MCQ) दिले जातील त्यामधून ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात येतील.

२. सदर परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर टप्प्याटप्प्याने प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित, अनुशेषित व रिपीटर (Regular/Backlog/Repeaters) ऑनलाईन परीक्षांच्या बाबतीत विद्यार्थ्यांना एसएमएस व ई-मेलद्वारे अवगत करण्यात येईल. मात्र यासाठी विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक कार्यान्वित असणे आवश्यक आहे.

४. ऑनलाईन परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला संगणकीय प्रणालीतून वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही जतन (Save) होऊन खंड पडल्यास तेथून परीक्षा पुन्हा सुरु होईल. तसेच परीक्षेदरम्यान काही अडचणी आल्यास (०२०) ७१५३०२०२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करावा.

५. ऑनलाईन परीक्षेची संपूर्ण माहिती होण्यासाठी परीक्षेमधील नमूना प्रश्नांवर आधारीत सराव परीक्षांचे आयोजन (Mock Test) मुख्य परिक्षेपूर्वी दिनांक ५ एप्रिल, २०२१ ते ९ एप्रिल २०२१ सकाळी १० ते दुपारी ३ पर्यंत या कालावधीत करण्यात येईल व तसे सर्व संबंधितांना अवगत करण्यात येईल.

६. दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील.

७. प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित, अनुशेषित व रिपीटर (Regular/Backlog/Repeaters) विषयांच्या ऑनलाईन पध्दतीने परीक्षा या परीक्षा विभागाचे परिपत्रक क्र. ४/२०२१ दि. १६ मार्च, २०२१ रोजी प्रसिध्द केल्याप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमावर होतील. तसेच अभियांत्रिकी २०१५ पॅटर्नच्या प्रथम वर्षाच्या प्रथम सत्रातील अनुशेषित विषयांच्या परिक्षा या १०० टक्के अभ्यासक्रमावर आधारित असतील.

5/4/21

5-4-21

| | | | |
|---|---|---|---|
| | 10.00 AM To 3.00 PM | | Post Graduate |

८. गणित व संख्याशास्त्र अभ्यासक्रमातील विषयांच्या परीक्षा ऑनलाईन प्रॉक्टर्ड पध्दतीने, बहुपर्यायी (MCQ) पध्दतीने, ५० गुणांकरिता, ३० प्रश्न प्रत्येकी २ गुणांसाठी या पध्दतीने विचारण्यात येतील. विद्यार्थ्यांनी दिलेली २५ प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राह्य धरण्यात येतील.

९. सर्व विद्यार्थ्यांना विषयात मिळालेले गुण (Online Score) हे परीक्षेनंतर ४८ तासात Student Profile System मध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पुढील ४८ तासाच्या आत अडचणी व शंका असल्यास तक्रार तेथेच नोंदवावी, Student Profile System मध्ये नोंदवीलेल्या तक्रारीच ग्राह्य धरण्यात येतील व त्यानंतर कोणत्याही सबबीवर तक्रार स्वीकारली जाणार नाही.

१०. प्रत्येक विद्यार्थी ऑनलाईन परिक्षा पूर्ण केल्याची पोहोच (Acknowledgement) दिसेल सदर बाबीचा स्क्रीन शॉट/फोटो/प्रिंट विद्यार्थ्यांनी आपल्याकडे जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

११. सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी sppuexam.in या संकेतस्थळाचा वापर करावा. तसेच परीक्षांबाबत सूचना (Instructions), उपयोगकर्ता पुस्तिका (User Manual) व व्हिडीओ (Videos) याच संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

मा.प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/६९
दिनांक : ०१ एप्रिल, २०२१

प्रति,

मा.प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/स्वायत्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा